# प्रतिज्ञा पत्र

**"दलित आत्मलेखनातील वेदना व विद्रोहाचे विशेष"**, **"गबाळ"** व **"उचल्या"** च्या आधारे या विषयावरील सदरची प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल. या पदवी परीक्षेसाठी लिहीली आहे. ही प्रबंधिका अथवा यातील कोणताही भाग मी अन्यत्र कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

कराड

**प्रा. विजय अर्जुन रेवजे**

दिनांक : १५।६।१९९९.

प्रा. डॉ. के. बी. कुंदप,
मराठी विभाग प्रमुख,
एस. जी. एम. कॉलेज,
कराड - ४१५११०

# प्रमाणपत्र

प्रा. विजय अर्जुन रेवजे यांनी **''दलित आत्मलेखनातील वेदना व विद्रोहाचे विशेष'' ''गबाळ''** व **''उचल्या''** च्या आधारे या विषयावर माझ्या मार्गदर्शनाने ही प्रबंधिका त्यानी स्वतः पूर्ण केली आहे. हा प्रकल्प विद्यापीठाच्या एम. फिल. पदवीसाठी सादर करण्यास मी अनुमती देत आहे. त्याचे शोध प्रबंधिकेचे काम पूर्णावस्थेत आहे व तो सादर करण्यास काहीही अडथळा नाही याची मला खात्री वाटते.

मार्गदर्शक

# भूमिका

'दलित आत्मलेखनातील वेदना व विद्रोहाचे विशेष' हा विषय एम.फिल. प्रबंधिकेसाठी निवडण्यात आला तो मार्गदर्शक डॉ. कन्हैय्या कुंदप यांच्याशी सल्ला मसलत करुनच.

बी.ए. आणि एम.ए. चा अभ्यास करताना विविध वाङ्‌मय प्रकाराबरोबच दलित साहित्याचा अभ्यास केला. पण त्या पुढे जाऊन या लेखनातील व्यथा, वेदना, सवर्णांनी त्यांची नाकारलेली त्यांची माणूसकी, त्यांचे उकिरड्यावर पंक्तीला बसणे, वेळोवेळी होणारा अन्याय अत्याचार इ. समग्र जीवन सुक्ष्मपणे समजून घ्यावे असे वाटू लागले. त्यासाठी अक्करमासी, बलुत, उपरा, गबाळ, कोल्हाट्याचे पोर इ. अनेक आत्मकथनांचा अभ्यास, वाचन केले. आज दलित साहित्य मराठी वाङ्मयाचे एक महत्त्वाचे अंग आहे. हे अंग समजून घेऊन दलित लेखकांची भूमिका समजून घ्यावी. त्यांच्यावर जे आरोप प्रत्यारोप होतात, त्यासबंधी कांही विचार मांडावा ही माझी या संशोधना मागील भूमिका आहे.

'गबाळ' आणि 'उचल्या' या दोन आत्मकथनाच्या अनुशंघाने दलित जीवन त्यांच्या व्यथा वेदना. विविध प्रवृत्ती, रुढी परंपरा, विवाह पध्दती, दांडी-मांडी कलम. सवर्ण समाजाच्या या समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, विविध शासकिय अधिकाऱ्याचे या समाजाकडचे पाहणे इ. विचार समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

निखळ संशोधनाच्या भूमिकेतून व दलित जीवन, त्यांच्या लेखनातील सौंदर्य समजून घेण्यासाठी ही आत्मकथने अभ्यासनीय वाटली व हा विषय निवडण्यामुळे आनंद झाला. मार्गदर्शकांनीही उत्तम मार्गदर्शनाने तो सजविला अर्थात प्रस्तुत अभ्यासाविषयीची निवड करण्यापासून ते प्रबंधिकेला पूर्णत्व प्राप्त करुन देण्यापर्यंत माझे माननीय व आदरणीय मार्गदर्शक डॉ. कन्हैय्या कुंदप. प्रपाठक व मराठी विभाग प्रमुख, सदगुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड यांनी जे बहूमोल मार्गदर्शन केले, प्रबंधिका पुर्ततेसाठी प्रेरणा दिली. म्हणून त्यांचे आभार मानणे हे आद्य कर्तव्य आहे.

एम.फिल. अभ्यासक्रमाला प्रवेश घेवून तो पूर्ण करण्यासाठी सहकार्य व प्रेरणा देणारे. सन्मानीय प्राचार्य ई. जी. निकम, स.गा.म. कॉलेज, कराड, यांचा मी ऋणी आहे. तसेच प्रा. सुमनताई पाटील, प्रा.सौ. सुर्यमाला जाधव, प्रा. बी.पी. पाटील, प्र. सौ. सरला निकम व प्रा. सौ. शोभना रैनाक यांचे सुयोग्य मार्गदर्शन मिळाल्याबद्दल त्यांचा मी अभारी आहे.

प्रबंधिकेसाठी आवश्यक अशी संदर्भ पुस्तके मिळवून देण्यासाठी 'सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज', कराड चे ग्रंथालय . 'बळवंत महाविद्यालय', विटा चे ग्रंथालय, त्यांचे ग्रंथपाल व त्यांच्या सहकार्याचे मी मन:पूर्वक आभार मानतो.